**सं.फौ.ख.क्र.४५९/२०२४**

**सरकार –वि– शंकर गांगुर्डे**

**निशाणी क्र. १९**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ ची शपथेवर जबानी.**

नांव – ज्ञानेश्वर अनिल भोगे

वय – ४६

धंदा – शेती

राहणार – कानमंडाळे, ता. चांदवड, जि. नाशिक

**<u>सर–तपासणी सरकारतर्फे श्री. आर. एम. वाळके सहा. सरकारी अभियोक्ता</u>**

१. दि.१३.०७.२०२३ रोजी मी सोग्रस ता. चांदवड येथे पंचनाम्यासाठी गेलो नव्हतो. मला आता घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखवण्यात आला. त्यातील मजकूराविषयी मला काही माहित नाही. त्यावर माझी सही आहे. सहीला **निशाणी २०** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**

**साक्षीदार सरकारी पक्षास सहकार्य करत नसल्यामुळे सरकारी वकीलांनी उलटतपासणीच्या स्वरुपातील सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. ती त्यांना देण्यात आली.**

२. हे म्हणणे खरे नाही की, पो.नि. त्रिभूवन यांनी मला सांगितले की, आरोपी सोग्रस फाटा येथे चोरट्यारितीने देशी प्रिंस संत्राची विक्री व वाहतुक करत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यासाठी पंचनामा करण्यासाठी त्यांनी मला व दुसरा पंच समाधान यशवंतेला येण्याची विनंती केली. त्याला मी संमती दिली. हे म्हणणे खरे नाही की, सोग्रस फाट्याजवळ आमचे खाजगी वाहन उभे करुन आम्ही रस्त्याच्या कडेला थांबलो असता एक इसम सोग्रस फाट्याजवळ मोटारसायकलवर वाहतुक करतांना दिसला. हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला मिळालेल्या बातमीची खात्री पटली त्यामुळे पोलिसांनी त्या इसमाला त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव शंकर गांगुर्डे असे

सांगितले.

३. हे म्हणणे खरे नाही की, त्याच्यावर छापा टाकून त्याची झडती घेतली असता देशी दारु प्रिंस संत्रा प्लॅस्टीकच्या सिलबंद १४० बॉटल मिळून आल्या. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्यासमक्षच आरोपीची बजाज बॉक्सर एम.एच.१५, ए.एल.४६८५ जप्त केली. हे म्हणणे खरे नाही की, त्यापैकी एक बाटली पोलिसांनी सॅम्पल म्हणून काढून घेतली व त्यावर आमच्या व पोलिसांच्या सह्यांची कागदी लेबले लावली. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्यासमक्ष केलेल्या पंचनाम्यावर मी वाचून सही केली.

४. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीशी माझे चांगले संबंध असल्यामुळे त्याला वाचवण्यासाठी मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलततपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीचे वकील श्री. एस. डी. मांदळे यांनी नाकारला.**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

SUNGARE VRUSHALI DINANATH

Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2026.03.10 17:49:07 +0530

**दि. १०.०३.२०२६**

**(वृषाली दी. सुंगारे)**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**

**क.स्तर चांदवड.**